
स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड
RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव



भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित
२० वर्ष
एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

ई पेपर वाचा
http://epaper.beedvastav.com
https://www.beedvastav.com

# ऐन निवडणुकीच्या तोंडावर 'डीएमओ'
# दलित, मुस्लिम, ओबीसी फॉर्मुल्याचा
# सोशल मीडियावर जोरदार प्रचार सुरू!!

योग्यता, कार्यक्षमता असताना किती दलित, मुस्लिम आणि ओबीसी यूवकांकडे सत्ताधारी पक्षातील महत्त्वाची पदे आहेत, हे ही दाखवा?

नेतृत्व क्षमता असताना देखील दलित, मुस्लिम, ओबीसी युवकांना एखाद्या 'सेल'चे अध्यक्ष करून मुख्य पदापासून जाणीवपूर्वक टाळले जाते!!

एखाद्या जातीच्या सेलचे अध्यक्ष करायचे आणि आयुष्यभर सतरंज्या उचलायला लावायचे हा अपमान आता मात्र सहण करायचा नाही!!

## म्हणे! आता जशास तसे उत्तर देण्यासाठी राज्यात मोठ्या ताकदीने 'डीएमओ' फार्मूला राबवायचा निर्णय!!

**बीड : एकीकडे फुले, शाहू, आंबेडकरांचा पुरोगामी महाराष्ट्र म्हणून दलित, मुस्लिम आणि ओबीसीमधील योग्यता, कार्यक्षमता, नेतृत्व गुण असणाऱ्या अनेक तरुणांना एकत्रित आणायचे आणि जातनिहाय सेलचे अध्यक्षपद देऊन त्यांच्याकडून आयुष्यभर सतरंज्या उचलण्याचे काम करून घ्यायचे, हा धंदा तसा पूर्वी महाराष्ट्र म्हणणाऱ्या अनेक दिग्गज आणि निर्लज्ज पुढऱ्यांसाठी नवा नाही! आज अशा मतलबी पुढाऱ्यांच्या जाळ्यात असलेल्या असंख्य कार्यकर्त्यांच्या आयुष्याची राख रांगोळी झाल्याले, देशोधडीला लागल्याचे पहावास मिळतील. हे स्वार्थी आणि निर्लज्ज पुढारी फक्त त्या कार्यकर्त्याचेच आयुष्य बरबाद करीत नाहीत तर त्यांच्यावर अवलंबून असलेल्या संपूर्ण कुटुंबाची वाताहत करण्यात धन्यता मानतात. आशा स्वार्थी, मतलबी, विश्वास घातकी आणि बेशरम पुढाऱ्यांची साथ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये डीएमओ फार्मूला वापरून सोडून देण्याचा ठाम निर्णय या तरुणांनी घेतला असल्याच्या पोस्ट सध्या सोशल मीडियात फिरताना दिसून येत आहेत. विशेष म्हणजे हा फार्मूला वापरला गेला तर निश्चितच राज्याच्या राजकारणात फार मोठा बदल झालेला दिसून येईल.**




### दलित, मुस्लिम वोटिंगमुळेच बजरंग सोनवणे बीड जिल्ह्याचे खासदार झाले!

● मागील लोकसभा निवडणुकीमध्ये जातीय राजकारणाच्या ध्रुवीकरणामुळे बीड जिल्ह्यात भाजप नेत्या पंकजा मुंडे यांना लोकसभा निवडणुकीत पराभवाचा सामना करावा लागला. लोकसभा निवडणुकी दरम्यान दलित आणि मुस्लिम वोटिंग अत्यंत निर्णायक ठरली. विशेष म्हणजे त्यावेळी राजकीय जाणकारांनी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने दलित आणि मुस्लिम वोटिंग ज्यांच्या बाजूने असेल तोच बीड जिल्ह्याचा खासदार असेल असे भविष्य त्यावेळी वर्तविण्यात आले होते, ते तंतोतंत खरे ठरले. लोकसभा निवडणुकीच्या वेळी दलित आणि मुस्लिम वोटिंगकडे भाजपा नेत्या पंकजा मुंडे यांनी म्हणावे तेवढे लक्ष दिले नाही आणि नेमके याच ठिकाणी त्यांचा घात झाला. बजरंग सोनवणे यांना देखील आपल्या विजयाची खात्री नव्हती. परंतु, शेवटच्या काही दिवसांपासून ते मतदान संपेपर्यंत बजरंग सोनवणे यांनी दलित, मुस्लिम यांचा संपर्क कायम ठेवला. त्यामुळेच बजरंग सोनवणे यांचा विजय झाला हे वास्तव कोणीलाही नाकारता येणारे नाही.

### बीड जिल्ह्यातील डीएमओ फॉर्म्युल्याचे लोन राज्यात पसरणार!!

● येऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये बीड जिल्ह्यातील जातीय ध्रुवीकरणामुळे डीएमओ फार्मूला प्रभावीपणे राबविण्यासाठी कार्यकर्त्यांनी चांगलीच मोट बांधल्याचे सध्या सोशल मीडियात व्हायरल पोस्टवरून दिसून येत आहे. मागील काही दिवसांपासून जाती-जातीमध्ये मतभेद वाढला आहे. याला संपूर्णत: राजकारणीच जबाबदार असल्याच्या भावना आहेत. त्यामुळे साहजिकच याचे चांगले किंवा वाईट परिणाम निवडणुकांवर होताना दिसून येत आहेत. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये देखील आता 'डीएमओ' नावाचा नवा फार्मूला पुढे आणला गेला आहे. क्या फॉर्मुल्याचे परिणाम अत्यंत चांगले दिसून येणार आहेत. कारण योग्यता आणि कार्यक्षमता असलेल्या परंतु काही स्वार्थी राजकारण्यांनी जाणीवपूर्वक बाजूला फेकून दिलेल्या अनेक नेतृत्व गुण संपन्न दलित, मुस्लिम आणि ओबीसीतील तरुणांना येऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत सत्तेची चव चाखता येणार आहे.

**लोकसभेत दलित, मुस्लिम फॉर्म्युला यशस्वी झाला आता डीएमओ फॉर्मुला यशस्वी होणार!**

● बीड जिल्ह्यातील जातीय ध्रुवीकरणामुळे मागील लोकसभा निवडणुकीत दलित आणि मुस्लिम समाज एकत्र आला होता.

● त्याचे अत्यंत महत्त्वाचे कारणे असे होते की, या समाजातील सक्षम आणि नेतृत्व गुणसंपन्न असलेल्या युवकांना कधीच चांगल्या ठिकाणी जाणून बुजून संधी दिली गेली नाही. याचा वचपा काढण्यासाठी मागील लोकसभा निवडणुकीत दलित आणि मुस्लिम फॉर्म्युला अत्यंत यशस्वी आणि प्रभावी ठरला.

● योग्यता आणि कार्यक्षमता असताना देखील आपल्याच नेत्यांकडून अपमानित झालेल्या दलित आणि मुस्लिम समाजातील तरुणांनी नेत्यांचा आणि निकटवर्तीयांचा आदेश धुडकवून लावत आपली ताकद दाखवून देण्यासाठी दलित, मुस्लिम हा फॉर्मुला राबवून बीड जिल्हा लोकसभा निवडणुकीत नवा इतिहास रचला आणि दलित, मुस्लिम फार्मूला यशस्वी करून दाखविला.

### डीएमओ' फॉर्मुला प्रभावीपणे राबविला तर सतरंज्या उचलणारे सत्तेत दिसतील!

● दलित, मुस्लिम आणि ओबीसीमधील चार दोन बोटावर मोजणे इतके सोडले तर नेतृत्व गुण आणि क्षमता असलेल्या कॅफेबल अनेक तरुणांच्या मागील पिढ्यांचे आयुष्य सतरंज्या उचलण्यातच गेले, हे वास्तव कोणीही ना करू शकत नाही! तेव्हा आता योग्य वेळ आली आहे, सतरंज्या उचलण्यापेक्षा सत्तेत राहण्याची, पण आता ही वेळ दवडू नका! लक्षात असू द्या 'डीएमओ' फार्मूला राज्याच्या सत्तेत प्रचंड मोठी उलथापालथ करून अपेक्षित बदल घडवून आणू शकतो.

● स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत 'डीएमओ' चा प्रयोग करून पहा तुम्हाला नक्कीच याचे अपेक्षित रिझल्ट मिळणार आहेत. आजपर्यंत आपल्या पिढ्यांनी सतरंज्या उचलल्या आहेत. मात्र, आपण आता सतरंज्या उचलणार नाहीत तर सत्तेत येणार आहोत.

● यासाठी 'डीएमओ' हा फार्मूला अत्यंत प्रभावी असल्यामुळे हे शक्य होणार आहे, अशाही भावना सोशल मीडियावरून व्यक्त होऊ लागल्या आहेत.

---

शिरूरकासार तालुक्याला नवा महामार्ग लाभणार ➤ नागरिकांत समाधान व्यक्त

## मुख्यमंत्री फडणवीस यांचे तिंतरवणी-पाडळी फाटा रस्त्याबाबत आश्वासन

➤ **शिरूरकासार : प्रतिनिधी**

शिरूरकासार तालुक्याच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरणारा तिंतरवणी-निमगाव मायंबा-नांदेवाली-आर्वी-पाडळी फाटा हा राज्य मार्ग क्रमांक ६२ लवकरच साकार होणार असल्याचे मुख्यमंत्री यांनी आश्वासन दिले आहे.

शिरूरकासार येथील टिम देवेंद्र फडणवीस यांचे कार्यकर्ते व पाडळी येथील नवनाथ सानप यांनी अलीकडेच मुंबई येथील मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीत त्यांनी तिंतरवणी-निमगाव-आर्वी-पाडळी फाटा-रायमोह या महामार्गाच्या कामाबाबत चर्चा करून त्याच्या मंजुरीसाठी राज्य सरकारमार्फत केंद्र शासनाला शिफारस करण्याची विनंती केली.

या प्रस्तावावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी सकारात्मक भूमिका घेत, संबंधित रस्त्याच्या कामासाठी महाराष्ट्र शासन केंद्र सरकारकडे सिफारस करून हा विषय मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.

राज्य मार्ग क्रमांक ६२ हा अनेक वर्षांपासून रखडलेल्या अवस्थेत आहे. या रस्त्याच्या कामाला मंजुरी मिळाल्यानंतर तिंतरवणी मार्गे विशाखापट्टणम राष्ट्रीय महामार्ग, नवगण राजुरी-खरवंडी राष्ट्रीय महामार्ग, तसेच बीड-शिरूरकासार-पाथडी राज्य मार्ग या तीन महत्त्वाच्या मार्गांना थेट जोड मिळणार आहे. यामुळे प्रवासाचा कालावधी व अंतर दोन्ही लक्षणीयरीत्या कमी होणार



असून, दळणवळण अधिक सुलभ होईल. तसेच मच्छिंद्रगड, निमगाव, पैठण, पंढरपूर यांसारख्या महत्त्वाच्या धार्मिक स्थळांकडे जाणारा मार्ग अधिक सोपा आणि सोयीस्कर होईल .या उपक्रमामुळे तीन प्रमुख महामार्गांना तसेच धार्मिक स्थळांना जोडणारा हा महत्त्वपूर्ण रस्ता उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे शिरूरकासार तालुक्याच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल, असा विश्वास टीम देवेंद्र चे कार्यकर्ते नवनाथ सानपयांनी व्यक्त केला जात आहे.

---

## डॉ.योगेश क्षीरसागरांच्या आवाहनानंतर रा.काँ. पक्षाकडे इच्छुकांचे दीडशेहून अधिक अर्ज; बीड शहरात रा.काँ.पक्षाला उत्स्फूर्त प्रतिसाद

### नगराध्यक्षपदासाठी १५ हून अधिक इच्छुक

➤ **बीड (प्रतिनिधी) दि.५** : आगामी बीड नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने डॉ.योगेश क्षीरसागर यांनी नगराध्यक्ष, नगरसेवकपदासाठी इच्छुक कार्यकर्त्यांकडून अर्ज मागविले होते. डॉ. क्षीरसागर यांच्या आवाहनानंतर बीड शहरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून एकाच दिवसात दीडशेहून अधिक अर्ज पक्षाकडे दाखल झाले आहेत.● पान ३ वर...

### डॉ.योगेश क्षीरसागर यांचे संघटन मजबूत

● उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.योगेश क्षीरसागर यांनी बीड शहरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संघटन मजबूत केलेले आहे. तसेच, इच्छुकांच्या अर्ज संख्येवरून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे.



---

## नगरपरिषद निवडणुकीसाठी राष्ट्रवादीचे उमेदवारी अर्ज स्वीकारण्यास मुदतवाढ



### 7 नोव्हेंबरपर्यंत अर्ज दाखल करण्याचे शहराध्यक्ष अमर नाईकवाडे यांचे आवाहन

**बीड (प्रतिनिधी)**
बीड नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास शहरातील कार्यकर्त्यांचा मोठा उत्साह दिसून येत आहे. कार्यकर्त्यांच्या वाढत्या प्रतिसादाचा विचार करून पक्षाच्या उच्चस्तरीय निर्देशानुसार अर्ज स्वीकारण्याची अंतिम मुदत वाढविण्यात आली आहे. आता इच्छुकांना ७ नोव्हेंबर २०२५ पर्यंत अर्ज दाखल करता येणार आहेत, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अमर नाईकवाडे यांनी दिली.

अमर नाईकवाडे म्हणाले, "नगरसेवक आणि नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांकडून मोठ्या प्रमाणावर अर्ज दाखल केले जात आहेत. पूर्वनिर्धारित● पान ३ वर...

विशेष



# दुसऱ्यांशी चांगले वागूनही, लोकं आपल्याशी वाईट का वागतात...?

● ..............जाणून घ्या कारण



आपण चांगले तर जग चांगले, ही थोरामोठ्यांची शिकवण आपण अंमलात आणतो. परंतु बरेचदा अनुभव असा येतो की, कितीही चांगले वागा, पण लोकन आपल्याशी वाईटचं वागतात. असे का? हा प्रश्न आपल्याला पडतो आणि चांगुलपणावरून आपला विश्वास उडायला लागतो. त्यावर उत्तर दिले एका साधूमहाराजांनी...!

एका गावातला एक तरुण अतिशय साधा, भोळा आणि प्रेमळ होता. कोणी कसेही वागो, पण त्याने आपला चांगुलपणा कधीचं सोडला नव्हता. परंतु एक वेळ अशी येते, जेव्हा संयमाचा बांध फुटतो आणि आपल्याला स्वत:च्या चांगुलपणाचाही राग येऊ लागतो.

मन व्यवहारी होते, स्वार्थी होते, परंतु हा बदलही आपल्याला सहन होत नाही. कारण चांगले वागणे हा आपला स्थायी भाव असतो.
त्या तरुणाच्या बाबतीतही तेच झाले.

तो अतिशय अस्वस्थ होता. त्याने गावातल्या एका साधूबाबांकडे जाऊन शंकेचे समाधान विचारले. साधू महाराजांनी त्याला आपल्या सदऱ्याच्या खिशातून एक अंगठी दिली आणि म्हणाले, 'पुढचा आठवडाभर ही अंगठी तू तुझ्याजवळ ये आणि त्याची किंमत किती मिळू शकेल याचा शोध घे. फक्त काही केल्या ही अंगठी विकू नकोस!'

प्रश्न आणि उत्तर यांचा परस्पर काहीही संबंध नसताना साधूमहाराजांनी दिलेले काम पाहून तरुण निराश झाला. परंतु त्याने दिलेले काम पूर्ण करायचे ठरवले.
तो एका व्यापाऱ्याजवळ गेला. त्याला अंगठी दाखवली. तो त्या अंगठीचे हजार रुपये देईन म्हणाला. तरुण मुलगा दुसऱ्या व्यापाऱ्याकडे गेला, त्या व्यापाऱ्याने दहा हजाराची बोली लावली. तिथून तो एका सोनाराकडे गेला. सोनाराने अंगठी नीट पाहिली आणि म्हणाला एक लाख रुपए देतो, पण ही अंगठी मलाचं विक! तरुण मुलगा गोंधळला. तिथून तो एका जवाहिराकडे गेला. त्याने मोल ठरवायला वेळ लावला पण त्याने जे उत्तर दिले ते ऐकून तरुण मुलगा चक्रावला....!
जवाहीर म्हणाला, माझी सगळी संपत्ती देऊ केली तरी या अंगठीचे मोल मला फेडता येणार नाही, हे ऐकून गोंधळलेला तरुण साधूमहाराजांकडे परत आला. त्याने सगळी हकीकत सांगितली.

त्यावर साधूमहाराज म्हणाले, बाळा..अंगठीची किंमत ज्याने त्याने आपल्या कुवतीनुसार सांगितली. जो खरा रत्नपारखी होता त्याने ही अंगठी अमुल्य आहे असे सांगितले. याचाच अर्थ आपले गुण ओळखणारा आणि त्या गुणांची कदर करणारासुद्धा तेवढाचं गुणवान असावा लागतो. जे लोकं तुझी किंमत करत नाहीत, ते त्यांच्या कुवतीप्रमाणे तुझ्याशी व्यवहार करतात. मात्र जे तुला ओळखतात ते तुझी किंमत, योग्यता समजतात.

तू ही अंगठी आहेस हे आधी ओळख आणि तुझी किंमत सामान्य व्यापाऱ्याने ओळखावी अशी अपेक्षा करू नकोस. तू तुझा चांगुलपणा कायम ठेव. कोणीतरी रत्नपारखी आयुष्यात नक्कीच भेटेल.

## एक गोष्ट सदैव लक्षात ठेवा कि....

रिकाम्या भांड्यावर झाकण आणि चुकीच्या विचारांची पाठराखण काही उपयोगाची नसते. तुम्ही चांगले आहात की वाईट हा विचार कधीचं करू नका,
कारण...लोकांना गरज पडली की तुम्ही चांगले आणि गरज संपली की वाईट.
आपण पायाने चालतो तेव्हा तो प्रवास होतो हृदयाने चालतो तेव्हा ती यात्रा होते आणि भान हरपून चालतो तेव्हा ती वारी होते.

माणूस एक अजब रसायन आहे, आवडला तर त्याचे दोष दिसत नाहीत आणि नाही आवडला तर त्याचे चांगले गुण पण दिसत नाहीत.

नेहमी मन निर्मळ ठेवा व प्रामाणिक राहा...कुणी कितीही फसवले तरी एक लक्षात ठेवा प्रामाणिक माणसाच्या पाठीशी नेहमी सत्य उभ असतं...!

## "माझं चुकलं?...

हे शब्द समोरच्याचा काळजाला स्पर्श करतात परंतु हे शब्द म्हणण्यासाठी फार सामर्थ्य लागतं"...हे सामर्थ्य आपल्या सर्वांमध्ये वृद्धींगत होवो हीच सदिच्छा...!

# हृदयविकाराच्या तीन तास आधी दिसणारी लक्षणे





## एक जीव वाचवणारा संदेश

आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत, हृदयविकार ही एक सामान्य पण जीवघेणी समस्या झाली आहे. अनेकदा आपण अशा घटनांबद्दल ऐकतो — कुणीतरी अचानक कोसळलं, हॉस्पिटलमध्ये पोहोचेपर्यंत उशीर झाला... आणि एक अनमोल जीव गमावला गेला. पण आपल्याला हे माहीत आहे का की हृदयविकाराचा झटका येण्याच्या तीन तास आधी शरीर आपल्याला स्पष्ट इशारे देतं? होय! आपला मेंदू हे संकेत आपल्याला सतर्क करण्यासाठी देतो. यासाठी थोडं जागरूक राहणं आणि योग्य ती कृती करणं गरजेचं आहे.

## मेंदू देतो सूचक इशारे

मेंदू हा एक असा अवयव आहे, जो शरीरात होणारे सूक्ष्म बदलही त्वरेने ओळखतो. हृदयविकार येण्याच्या काही तास आधी, मेंदू आपल्याला सूचित करतो. हे लक्षणे मधुमेहींमध्ये जाणवणं कठीण जातं, कारण त्यांच्या नसा आधीच संवेदनशीलतेत कमकुवत होतात. जर एखादी व्यक्ती : अचानक बेशुद्ध झाली, बॅलन्स गमावून पडली, डोकं गरगरल्यासारखं वाटू लागलं, ...तर त्वरित दुर्लक्ष न करता कृती केली पाहिजे.

STR तपासणी – तीन सोप्या कृती जीवन वाचवू शकतात डॉक्टर्स सांगतात की STR ही एक सोपी पण प्रभावी चाचणी आहे :

S – SMILE (हसवून पाहा) – चेहरा एका बाजूला वळला असेल का पाहा.

T – TALK (बोलायला सांगा) – स्पष्ट बोलता येतंय का ते तपासा. शब्द गडबडलेले असतील का पाहा.

R – RAISE BOTH HANDS (दोन्ही हात वर उचलायला सांगा) – दोन्ही हात सहजपणे वर जातात का ते पहा. यापैकी एक जरी कृती नीट करता आली नाही, तर तात्काळ रुग्णालयात नेणं अत्यंत गरजेचं आहे.

## अजून एक सोपी पण महत्तवाची चाचणी –

जीभ तपासणे रुग्णाला जीभ बाहेर काढायला सांगा. जर ती सरळ बाहेर आली – ठीक. पण जर ती डावी किंवा उजवीकडे वळलेली असेल, तर ही एक स्पष्ट अलार्म सिग्नल आहे. अशा स्थितीत पुढील तीन तास अतिशय नाजूक असतात.

## हे चुका टाळा:

जर हृदयविकाराचा संशय वाटत असेल, तर खालील चुका टाळाव्यात : रुग्णाला चालायला लावू नका जिने चढू/उतरू देऊ नका ऑटोतून हॉस्पिटलला पाठवू नका – शक्य असल्यास ॲम्ब्युलन्स बोलवा. कारण थोडीशी हालचाल देखील हृदयावर ताण आणू शकते आणि परिस्थिती गंभीर बनवू शकते.

मानवतेच्या दृष्टिकोनातून कृती करा हा लेख केवळ माहिती देण्यासाठी नाही, तर जीव वाचवण्यासाठी आहे. वैद्यकीय आकडेवारीनुसार, जर ही माहिती वेळेवर पोहोचवली गेली, तर १०% मृत्यू सहज टाळता येतात.

आपण काय करू शकतो? हा लेख वाचला असल्यास, कृपया किमान ५ लोकांपर्यंत शेअर करा. तुमच्या कुटुंबातील ज्येष्ठ सदस्य, मधुमेही, हृदयविकारग्रस्त लोकांसोबत ही माहिती शेअर करा. ऑफिस, सोशल मीडिया ग्रुप्स, शाळा, महाविद्यालय इथेही ही माहिती पोहोचवा.

शेवटी... आज तुम्ही हा संदेश वाचून गप्प बसलात, तर कदाचित उद्या एखादा जीव वाचणार नाही. पण जर तुम्ही हा लेख शेअर केला, तर कुणाच्यातरी आयुष्यात फरक पडू शकतो. "हृदयाचे आरोग्य राखणे ही फक्त जबाबदारी नाही, तर मानवतेची कर्तव्य आहे."

# तुम्हाला खरचं शुगरपासून दूर राहायचंय का? मग हे नियम पाळाच!

## परिचय

● डायबेटीस, ज्याला आपण मराठीत "मधुमेह" म्हणतो, ही आजच्या युगातील सर्वात सामान्य आणि वाढती समस्या आहे. आधुनिक जीवनशैली, खाण्याच्या चुकीच्या सवयी, मानसिक तणाव, झोपेचा अभाव आणि शारीरिक हालचालींचा अभाव यामुळे हा आजार अगदी लहान वयातसुद्धा दिसून येतो आहे.

● परंतु एक गोष्ट लक्षात ठेवा — डायबेटीस पूर्णपणे टाळता येऊ शकतो, जर आपण योग्य सवयी अंगीकारल्या, तर शुगर कधीच होणार नाही.

● हा ब्लॉग तुम्हाला त्याच दिशेने मार्गदर्शन करतो. येथे आपण डायबेटीस कधीच होणार नाही यासाठी आहार, जीवनशैली, मानसिक आरोग्य, व्यायाम, नैसर्गिक उपाय आणि नियमित तपासण्या यांचे विस्तृत विवेचन करणार आहोत.

## १. आहार:

● शुगरवर नियंत्रण ठेवणारे खरे शस्त्र

शरीरातील साखरेचे प्रमाण मुख्यत: आपल्या खाण्यापिण्यावर अवलंबून असते. चुकीचा आहार म्हणजे शुगर वाढवणारा प्रमुख घटक. म्हणूनच योग्य आहाराचे महत्त्व सर्वात जास्त आहे.

### i. ग्लायसेमिक इंडेक्स (GI) कमी असलेले अन्न घ्या

● ग्लायसेमिक इंडेक्स कमी असलेले अन्नपदार्थ हळूहळू पचतात आणि रक्तातील साखरेची पातळी हळूहळू वाढवतात, जे मधुमेहापासून वाचवते.

### उदाहरण:

● बाजरी, रागी, नाचणी, ज्वारी
● पालक, कारले, परवल, गाजर
● चवळी, मूग, हरभरा, मसूर डाळ
● सफरचंद, संत्रं, पेरू, बेरीज

### ii. साखर आणि मैदा टाळा

● पांढरी साखर आणि पांढऱ्या मैद्याचे पदार्थ (जसे की ब्रेड, बिस्किट्स, केक, पिझ्झा) हे GI मध्ये उच्च असतात आणि शुगर झपाट्याने वाढवतात.

### iii. संतुलित जेवण करा

● ताटामध्ये फायबर, प्रथिने, चांगल्या चरबी (गुड फॅट्स) आणि कम GI असलेले कार्बोहायड्रेट यांचे संतुलन असले पाहिजे.

### स्मार्ट प्लेट पद्धत:

● ५०% भाज्या
● २५% संपूर्ण धान्य किंवा डाळी
● २५% प्रथिने – टोफू, डाळी, अंडी, मासे, चिकन
● थोडे बदाम, अक्रोड, १ चमचा घरी बनवलेले तूप

### iv. पाणी आणि साखर नसलेले पेय प्या

● फळांचे रस, कोल्ड ड्रिंक्स, साखर घालून बनवलेले पेय टाळा. पाण्याचे सेवन वाढवा, ग्रीन टी, हर्बल टी प्या.

## २. व्यायाम: इन्सुलिनची शक्ती वाढवणारे साधन

● रोजचा व्यायाम म्हणजे आपल्या शरीराला डायबेटीसशी लढण्यासाठी सज्ज करणं.

### i. कार्डिओ व्यायाम

● चालणे (३०–४५ मिनिटे)
● सायकल चालवणे
● पोहणे
● जलद चालणे



### ii. योग आणि प्राणायाम

● योगाचे काही विशेष आसने जसे की वज्रासन, भुजंगासन, पवनमुक्तासन आणि प्राणायाम (अनुलोम–विलोम, कपालभाती) हे पचन सुधारतात, तणाव कमी करतात आणि रक्तातील साखरेवर नियंत्रण ठेवतात.

### iii. वजन प्रशिक्षण (Strength Training)

● आठवड्यातून किमान २–३ वेळा वजनवर्गीय व्यायाम (डम्बेल्स, बेंच प्रेस, पुल–अप्स) यामुळे स्नायू इन्सुलिन वापरतात आणि त्यामुळे शुगर नियंत्रित राहते.

## ३. मानसिक आरोग्य: शुगर होण्याचा गुप्त शत्रू

● तणाव (Stress) आणि झोपेचा अभाव हे शुगर वाढण्याचे गुप्त कारण असतात. कोर्टिसोल नावाचा स्ट्रेस हार्मोन साखरेचे प्रमाण वाढवतो.

### i. तणाव व्यवस्थापन

● ध्यान (Meditation)
● प्राणायाम
● संगीत
● प्रकृतीभ्रमण (निसर्गात फेरफटका)

### ii. झोपेचा दर्जा

● दररोज कमीत कमी ७–८ तास शांत झोप घ्या
● मोबाईल, स्क्रीन वेळ झोपेपूर्वी १ तास बंद ठेवा
● अंथरुणावर जाण्याची वेळ ठरवा

## ४. वजन नियंत्रण: पोटाची चरबी = शुगरचा धोका

● वाढलेलं वजन, विशेषत: पोटाभोवती साठलेली चरबी (Belly Fat), ही टाइप २ डायबेटीसचं मुख्य कारण आहे. त्यामुळे वजन नियंत्रित ठेवणं हे अतिशय आवश्यक आहे.

### उपाय:

● आठवड्यात ३०० मिनिटे सक्रिय राहा
● आहारात गोड/फास्ट फूड कमी करा
● हळूहळू वजन घटवा – एकदम नाही
● लक्ष्य : BMI १८.५ ते २४.९ दरम्यान ठेवा.

## ५. नियमित तपासण्या: आज लक्ष द्या, उद्याचा धोका टाळा

● तपासण्या केल्याने आपण वेळीच धोका ओळखू शकतो आणि त्यावर उपाय करू शकतो.

### i. रक्तातील साखरेच्या चाचण्या:

● Fasting Blood Sugar (FBS) : ७०–९९ mg/dL
● Postprandial (जेवणानंतर) : <140 mg/dL
● HbA1c (सरासरी ३ महिन्यांची शुगर) : <5.7%

### ii. इतर महत्तवाच्या चाचण्या:

● कोलेस्टेरॉल
● रक्तदाब
● यकृत कार्य
● थायरॉईड
● किडनी तपासणी
● विशेष : जर तुमच्या कुटुंबात कोणाला डायबेटीस असेल, तर दर ६ महिन्यांनी तपासण्या करा.

## ६. नैसर्गिक आणि आयुर्वेदिक उपाय

● i. मेथी दाणे पाणी
● मेथी फायबरने भरलेली असते आणि साखरेचं शोषण हळू करते.

### कसा वापरावा?

● १ चमचा मेथी दाणे रात्री पाण्यात भिजवून सकाळी ते पाणी प्या.

### ii. कारल्याचा रस

कारल्यामध्ये इन्सुलिनसारखी कार्य करणारी नैसर्गिक रसायने असतात.

### iii. जांभूळ बीज पावडर

रक्तातील साखर कमी करण्यासाठी वापरली जाते. अर्धा चमचा पावडर कोमट पाण्यात घेता येते.

### iv. गिलोय, आंवळा, आवळा ज्यूस

हे घटक रोगप्रतिकारशक्ती वाढवतात आणि मधुमेहापासून संरक्षण करतात.

## ७. काही अतिशय महत्तवाच्या दैनंदिन सवयी

● सकाळी लवकर उठणे आणि सूर्यप्रकाशात काही वेळ राहणे
● शरीराचा साखर चयापचय सुधारतो.
● जेवण वेळेवर घेणे, उपाशी न राहणे
● एकदम जास्त खाल्लं की शुगर अचानक वाढते.
● मोठा ताण टाळा
● तणाव = शुगर वाढ
● मोबाईल, सोशल मीडिया वापर मर्यादित ठेवा
● झोपेचा दर्जा सुधारतो.
● मासे, अंडी, नट्ससारख्या हेल्दी फॅट्सचा योग्य वापर करा
हे रक्तातील साखर नियंत्रित ठेवतात.

## निष्कर्ष:

● शुगर कधीच होणार नाही – हे शक्य आहे!

● डायबेटीस म्हणजे एक "जीवनशैलीचा आजार" आहे. त्यामुळे तो आली की उपाय करण्यापेक्षा, यायच्या आधी प्रतिबंध करणे हेच योग्य धोरण आहे.

## लक्षात ठेवा:

● योग्य आहार घ्या
● दररोज व्यायाम करा
● मानसिक तणावावर नियंत्रण ठेवा
● वेळेवर झोप घ्या
● नियमित तपासण्या करा
● नैसर्गिक उपायांचा वापर करा

## शुगर कधीच होणार नाही

ही तुमच्या हातातली गोष्ट आहे.

शिस्त, सजगता आणि सकारात्मक मानसिकता यांची जोड दिलीत तर तुम्ही आयुष्यभर डायबेटीसपासून दूर राहू शकता. आपल्या निरोगी आयुष्याच्या प्रवासाला आजपासून सुरुवात करा!

सांज दैनिक बीड वास्तव
सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड –४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक – जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक –अरविंद ओव्हाळ (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद–विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922

## विशेष

### मुक्तांगण



मुक्तांगणचे सुरक्षा विभाग प्रमुख विजय बोटे पाटील यांनी काढलेला हा मुक्तांगणचा सुंदर फोटो.



व्यसनमुक्ती केंद्र हे जेलप्रमाणे असेल अशी बऱ्याच लोकांची कल्पना असते.

पण मुक्तांगणमधले वातावरण अतिशय मोकळे आहे. सर्वजण तिथे आनंदाने राहतात.

मुक्तांगणची बिल्डिंग कोल्हापूरचे प्रसिद्ध आर्किटेक्ट शिरीष बेरी यांनी डिझाईन केली आहे. सौंदर्यदृष्टी, भरपूर प्रकाश, मोकळेपणा, पारदर्शकता जपण्याचा त्यात प्रयत्न केला आहे.

ज्यांना मुक्तांगण बघायची उत्सुकता आहे त्यांच्यासाठी पहिल्या कॉमेंटमधे आमचे मित्र अमित बिडवे आणि अनुष्का बिडवे यांनी केलेल्या युट्युब व्हिडिओची लिंक टाकत आहे. यात मुक्तांगणची बिल्डिंग तसेच मुक्तांगणची उपचार पद्धती याविषयीची सर्व माहिती मिळेल.

https://youtu.be/oAegpmIJWF4?si=7b6hNRQOQAiwHy8W


**मुक्ता पुणतांबेकर,**
संचालक, मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्र, पुणे
फोन 9922028366


# जिल्हाध्यक्ष शंकर देशमुखांच्या उपस्थितीत गेवराईत पंडित-पवारांनी बोलावली बैठक

## निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांच्या घेणार मुलाखती

**गेवराई : प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गेवराईत भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख, भाजप नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, युवानेते बाळराजे पवार यांच्या उपस्थितीत भाजपच्या इच्छुक उमेदवारांची बैठक आयोजित करण्यात आली असून निवडणुकीसाठी इच्छुक भाजप उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येणार आहेत. या बैठकीला बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन युवानेते यशराज पंडित आणि युवानेते शिवराज पवार यांच्यासह भाजपा पदाधिकाऱ्यांनी केले आहे. माजी राज्यमंत्री बदामराव पंडित आणि युवा नेते बाळराजे पवार हे दोघेही भारतीय जनता पार्टीत एकत्र आल्याने नगर परिषद, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीची ताकद निश्चितच वाढलेली आहे. त्यामुळे निवडणुकीसाठी भाजपमध्ये इच्छुकांची सुद्धा गर्दी वाढल्याचे दिसत आहे. याच पार्श्वभूमीवर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत इच्छुक असलेल्या भाजप उमेदवारांची मुलाखत घेण्यासाठी दिनांक 8 ऑक्टोबर 2025 रोजी गेवराई शहरातील कोल्हार रोडवर असलेल्या गजानन मंगल कार्यालय येथे सकाळी 11 वाजता बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीला भाजप जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख, भाजपा नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, भाजपा युवा नेते बाळराजे पवार, माजी जिल्हा परिषद सभापती युधाजित पंडित, प्रदेश कार्यकारणी सदस्य सर्जेराव तांदळे, जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे, जिल्हा उपाध्यक्ष सुंदर चव्हाण, जिल्हा सचिव ॲड सुरेश हाते, युवा नेते रोहित पंडित, समन्वयक गेवराई विधानसभा श्रीकांत सानप, भाजपा ज्येष्ठ नेते प्रकाश सुरवसे, सचिन दाभाडे, मनोज पाटील, राजेश पवार, उद्धव रासकर, सौ रूपालीताई कचरे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या बैठकीला गेवराई विधानसभा मतदारसंघातील भाजपच्या जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगर परिषद निवडणुकीसाठी इच्छुक कार्यकर्त्यांनी तसेच बदामराव पंडित मित्र मंडळातील सर्व ज्येष्ठ व युवा कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन भाजप युवा नेते यशराज पंडित, भाजप युवा नेते शिवराज पवार यांच्यासह सर्व भाजपा पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

### महाराष्ट्र रत्न पुरस्काराने सन्मानित भारतीय भोई समाज प्रदेशाध्यक्ष

## तुकाराम वानखेडे यांचा शेलगाव येथील दयानंद महाराज यांच्या हस्ते सत्कार

**चिंचोली लिंबाजी : सचिन गुरव**

कन्नड तालुक्यातील चिंचोली लिंबाजी येथून जवळ असलेल्या नेवूपूर धरण प्रकल्पाचे मत्स्य विभागाचे चेअरमन भारतीय भोई समाज प्रदेश अध्यक्ष तुकाराम वानखेडे यांना नाशिक येथे मिळालेल्या महाराष्ट्र रत्न पुरस्काराबद्दल आज शेलगाव येथील दयानंद महाराज आश्रमात धर्माचार्य 18 दयानंद महाराज यांच्या हस्ते सत्कार करून श्रीफळ देण्यात आले त्यावेळेस त्यांच्यासोबत चिंचोली लिंबाजी येथील तरुण कार्यकर्ते धनराज जगन्नाथ पवार, व योगेश दुसारिया परदेशी लोह उद्योजक चिंचोली यांची प्रमुख उपस्थिती होती. आज गुरुवार असल्यामुळे आश्रमात लाखो भाविकांच्या साक्षीनं तुकाराम वानखेडे यांना मिळालेल्या महाराष्ट्र रत्न पुरस्काराबद्दल महाराजांनी त्यांचे कौतुक करून. त्यांचा हा सत्कार केल्याचे समजते.

सत्कार समयी कार्यक्रमाच्या वेळेस. हजारो भाविक भक्त उपस्थित होते.

## लऊळच्या सई शिंदे ची सीए परीक्षेत उत्तुंग भरारी

**माजलगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील लऊळ येथील सामान्य कुटुंबातील सई सुरेश शिंदे हिने सप्टेंबर २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या सीए परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत त्यांचे या यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदन होत आहे.

लऊळ सारख्या ग्रामीण भागातील सामान्य कुटुंबातील आणि शिक्षनाची फारशी पार्श्वभूमी नसलेली साई शिंदे येथील रहिवाशी असून तिचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण माजलगाव येथील सिंधफना पब्लिक स्कुल या ठिकाणी झाले असून महाविद्यालयाइन शिक्षण हे गरवारे कॉलेज पुणे येथे झाले आहे तिने द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट



ऑफ इंडिया च्या वतीने सप्टेंबर २०२५ मध्ये पुणे येथे घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये घवघवीत हे संपादन केले आहे तिच्या यशाबद्दल ग्रामसेवक चंद्रकांत शिंदे, विजय करवा, देवानंद शिंदे, पद्माकर कुरे, बापूराव शिंदे, करांडे गुरुजी, गजानन देशमुख, भीमाशंकर स्वामी, पत्रकार अरविंद ओव्हाळ व विष्णू दादा उगले आणि सई चे वडील सुरेश शिंदे यांनी शुभेच्छा दिल्या.

### आसेफभाऊ शेख प्रभाग १३ चा प्रभावी चेहरा

## २४ तास समाजसेवेचे अंग असल्याने आई रेहाना शेखच्या उमेदवारीला प्रभागात पसंती

**माजलगाव : प्रतिनिधी**




ज्या समाजात आपण वावरतो, त्या समाजाप्रती आपले काही कर्तव्य आहेत. अशा समाजातील गरजूवंतांसाठी आपल्या मिळकतीतून आधार देणारा युवक म्हणून समाजसेवक आसेफभाऊ शेख माजलगाव परिसरात सर्व परिचित आहेत. त्यामुळे येत्या नगरपरिषद निवडणूकित प्रभाग १३ मध्ये महिला राखीव जागेत त्यांच्या आई रेहाना हारून शेख यांच्या उमेदवारीला नागरिकांकडून पसंती मिळत आहे.

प्रभाग १३ मध्ये नगरपरिषद निवडणुकीची चुरस निर्माण झाली आहे. परंतु या प्रभागात येतील समाजसेवक यांच्या प्रतिनिधी म्हणून त्यांच्या आई रेहाना हरुण शेख यांच्या नावाला उमेदवार म्हणून लोकांकडून स्वीकारल जात आहे. कुठलीही प्रसिद्धी न करता 'कोरोना काळात' आसेफ शेख याने गरिबांसाठी घेतलेली भूमिका ही कौतुकास्पदच होती. कोरोना काळात गरिबांना आसेफ शेख याचा आधार मोलाचा ठरला आहे. गोरगरिबांच्या सुखा दुखात पाठीशी उभा राहणारा हक्काचा आधार म्हणून आसेफ शेखकडे पाहिल्या जातं. शहरात साजऱ्या होणाऱ्या विविध महापुरुषांच्या जयंत्या, उत्सव, यातही 'आसेफ' चा सहभाग राहिला आहे.

परिसरातील गरीब विद्यार्थी, कष्टकऱ्यांनाही त्याचा मदतीचा हात नेहमीच दिसून येतो. कोणाच्या लग्नकार्यात, कोणाच्या दवाखान्याच्या कामालाही धावून जाणारा हा युवक असल्याने त्या नगरपरिषद निवडणुकीत त्यांचे प्रतिनिधी करणाऱ्या आई रेहाना हारुन शेख यांना प्रभागातील नागरिकांनी नगरसेवक करण्याचा संकल्प केला आहे. त्यामुळे आसेफभाऊ शेख प्रभाग १३ महिला ओपनचा प्रतिनिधित्व करणारा प्रभावी चेहरा ठरत आहे. त्यामुळे प्रभागातील २४ तास सेवेची पावती म्हणून नागरिकांनी त्यांच्या आईच्या उमेदवारीस पसंती दिली आहे.

## केसापुरी येथे अखंड हरिनाम सप्ताहास उत्साहात सुरुवात, १० नोव्हेंबर रोजी सांगता

**माजलगाव, / प्रतिनिधी :**




शहरानजीक असलेल्या केसापुरी येथे मागच्या सोमवारपासून अखंड हरिनाम सप्ताहाची सुरुवात झाली असून, त्याचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी श्री क्षेत्र केसापुरी येथे कै. ह.भ.प. बाजीराव महाराज जवळेकर यांच्या शुभ आशीर्वादाने गावातील अखंड सप्ताह सोहळ्याचे आयोजन सोमवारी ३ पासून सुरू झाले असून, त्याची सांगता १० रोजी होणार आहे. कार्यक्रमाच्या पहिल्या दिवसापासून सात दिवस प्रबोधनात्मक कीर्तन भजन व प्रसादाचा कार्यक्रम तब्बल सात दिवस वेगवेगळ्या महाराजांच्या कीर्तनाचा सामावेश आहे. ह.भ.प. भागवताचार्य माणिक महाराज रेंगे, ह.भ.प. रामायणाचार्य महंत ज्ञानेश्वर महाराज जाधव, ह.भ.प. शिवदान महाराज शास्त्री मोठेवाडीकर, ह.भ.प. विनोद वैभव माऊली महाराज पुंगळकर, ह.भ.प. कीर्तन केशरी संतोष महाराज वनवे, भागवताचार्य नामदेव महाराज फपाळ, ह.भ.प. भारत महाराज जोगी आणि शेवटी ह.भ.प. विष्णू महाराज जगताप यांचे काल्याचे कीर्तन होत आहे. मृदंगाचार्य विलास महाराज कोरडे. कार्यक्रमाची सांगता १० रोजी असून, या दिवशी काल्याच्या कीर्तनानंतर महाप्रसाद होईल. महाप्रसादाचे अन्नदाते सरपंच भारत (आबा) साबळे पाटील, भीमराव पवार हे राहणार आहेत. या सप्ताहाचा पंचक्रोशीतील भाविकांनी लाभघ्यावा, असे आवाहन गावकरी मंडळी यांनी केले आहे.







## नगरपरिषद निवडणुकीसाठी राष्ट्रवादीचे उमेदवारी अर्ज स्वीकारण्यास मुदतवाढ

● पान १ वरून... अंतिम मुदत ५ नोव्हेंबर होती. मात्र, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार तसेच वरिष्ठ नेत्यांच्या सूचनेनुसार ही मुदत दोन दिवसांनी वाढवून ७ नोव्हेंबर करण्यात आली आहे. उमेदवारी अर्ज राष्ट्रवादी कॉँग्रेस जिल्हा कार्यालय, मित्र नगर, बीड येथे उपलब्ध असून, हे अर्ज कार्यालयीन सरचिटणीस महादेव धांडे यांच्याकडे सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत जमा करायचे आहेत. अमर नाईकवाडे यांनी सर्व इच्छुक कार्यकर्त्यांना वेळेवर अर्ज दाखल करण्याचे आवाहन केले असून, निवडणुकीत राष्ट्रवादी कॉँग्रेसला मजबूत संघटित पद्धतीने उतरविण्यासाठी पक्षाची तयारी सुरू असल्याचेही यावेळी त्यांनी स्पष्ट केले.

## डॉ.योगेश क्षीरसागरांच्या आवाहनानंतर रा.कॉँ. पक्षाकडे इच्छुकांचे दीडशेहून अधिक अर्ज; बीड शहरात रा.कॉँ.पक्षाला उत्स्फूर्त प्रतिसाद

● पान १ वरून... राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी कार्यकर्ते व इच्छुकांना नाममात्र शुल्क भरून अर्ज फॉर्म घेऊन जमा करण्याचे आवाहन केले होते. आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून आतापर्यंत दीडशेहून अधिक इच्छुकांनी पक्षाकडे उमेदवारीसाठी अर्ज दाखल केले आहेत. त्यापैकी १५ हून अधिक इच्छुकांनी नगराध्यक्षपदासाठी अर्ज केले आहेत. या अर्ज प्रक्रियेद्वारे बीड शहरातील कार्यकर्त्यांसह नागरिकांचा कल राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाकडे असल्याचे स्पष्ट होत आहे.

## महा जम्बो शब्दकोडे



### आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दुःख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

### उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंतःकरण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - ** अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंतःकरण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | त | का | ने | ट | क | र | | धु | | टो | क | दा | र |
| सा | ग | र | | म | | स | ई | प | रां | ज | पे | | दा | स |
| | न | | द | | वा | र | स | | डे | रा | | लू | | वं |
| अ | म | री | श | पु | री | | | म | | सं | क | ट | | ती |
| ना | त | | र | त | | चौ | क | शी | | ध | | मा | घ | |
| थ | | र | थ | | मा | का | | द | र | | खा | र | | क |
| | मो | द | | क | ल | र | व | | वा | ट | प | | त | म |
| मे | ह | न | त | | व | | जी | व | न | | र | ख | वा | ला |
| ह | र | | | क | ण | ख | र | | गी | त | | रू | | |
| बू | | स | व | ड | | प | | उ | | ग | र | ज | वं | त |
| ब | र | खा | स्त | | रा | | उ | दा | ह | र | ण | | श | र |
| | ल्ल | | रा | ज | धा | नी | | स | ल | | जी | व | | बे |
| न | मा | ज | | न्म | | ल | ग्न | | का | | त | र | बे | ज |
| क | ला | का | र | | ना | म | | भी | | अ | | पा | | |
| ली | | त | ग | म | ग | | स | म | ज | दा | र | | शो | ध |

## आजचे राशि भविष्य

### मेष रास

या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर आजचा या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

### वृषभ रास

या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु आजचा भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून आजचापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

### मिथुन रास

या राशीसाठी आजचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे.

### कर्क रास

या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. आजचा तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

### सिंह रास

या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण आजचा गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### कन्या रास

या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. आजचा एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल.

### तूळ रास

आजचा, तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी आजचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

### वृश्चिक रास

आजचा तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका, अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

### धनु रास

आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल. अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वत:च्या कामात लक्ष द्यावे. जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर आजचा ती सुधारेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### मकर रास

या दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. आजचा तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु आजचा कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### कुंभ रास

या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहणार आहे. व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते. जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो.

### मीन रास

या राशीसाठी आजचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते. तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही आजचा यशाकडे वाटचाल कराल. आजचा व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते.

# युवासेना पदाधिकारी आढावा बैठकीस उपस्थित रहा : विपुल पिंगळे

**बीड : प्रतिनिधी**

युवासेना कार्याध्यक्ष पुर्वेशजी सरनाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत युवासेनेची एक महत्त्वपूर्ण पदाधिकारी आढावा बैठक आयोजित करण्यात आली असुन

हे बैठक दिनांक ७ नोव्हेंबर २०२५ रोजी सायं ४.०० वा नांदेड, हिंगोली, परभणी या जिल्ह्यांच्या बैठका होणार असून बैठकीचे ठिकाण हे शिवसेना मध्यवर्ती कार्यालय स्वातंत्र्य वीर सावरकर चौक निराला बाजार छत्रपती संभाजी नगर येथे होणार आहे व सायं ६ वाजता जालना व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या बैठक हि पण शिवसेना मध्यवर्ती कार्यालय स्वातंत्र्य वीर सावरकर चौक निराला बाजार छत्रपती संभाजीनगर येथेच होणार आहे



ह्या बैठका दोन दिवसाच्या बैठका असणार आहे

दिनाक ८ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी २ वाजता लातुर बीड व धाराशिव बैठकीचे ठिकाण परिमल मंगल कार्यालय धाराशिव येथे असणार आहे युवासेना मुख्य सचिव राहुलजी लोढे आणि युवासेना सचिव किरणजी साळी यांचीही या बैठकीला विशेष उपस्थिती असेल या बैठकीमध्ये आगामी निवडणुका लक्षात घेऊन संघटना अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होणार असून युवासेनेच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन युवा सेना कार्यकारणी सदस्य महाराष्ट्र राज्य तथा संपुर्ण मराठवाडा निरीक्षक विपुल पिंगळे यांनी केले आहे.

# अनिल जगताप यांची कपिलधारवाडीतील भूस्खलनग्रस्तांच्या पुनर्वसनाची मागणी

## अनिल जगताप यांचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांना निवेदन

**बीड : प्रतिनिधी**

बीड विधानसभा मतदारसंघातील कपिलधारवाडी येथे अलीकडे झालेल्या भूस्खलनामुळे स्थानिक नागरिकांचे मोठे नुकसान झाले असून परिसरातील जमिनीत भेगा पडल्यामुळे तेथील घरांना आणि नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर काल दि. 5 नोव्हेंबर 2025 मुक्तागिरी निवास, मुंबई येथे महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते मा. ना. एकनाथजी शिंदे साहेब यांना शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांनी निवेदन सादर केले. या निवेदनात कपिलधारवाडी येथील भूस्खलनग्रस्त नागरिकांच्या कायमस्वरूपी पुनर्वसनाची मागणी करण्यात आली. अनिलदादांनी निवेदनासोबत भूस्खलनग्रस्त ठिकाणांचे प्रत्यक्ष फोटो आणि सविस्तर माहिती सादर करत, प्रभावित नागरिकांना तातडीने सुरक्षित स्थळी हलविणे, पुनर्वसनासाठी ठोस योजना तयार करणे आणि भविष्यात अशा



आपत्तींपासून बचावासाठी आवश्यक उपाययोजना राबविण्याची मागणी केली. या निवेदनावर प्रतिसाद देताना उपमुख्यमंत्री शिंदे साहेब यांनी, कपिलधारवाडीतील लोकांची समस्या सोडवण्यासाठी शासन पातळीवर तातडीने ठोस पावले उचलली जातील, असे आश्वासन दिले. या प्रसंगी शिवसेना संपर्क नेते अर्जुनजी खोतकर साहेब आणि शिवसेना मराठवाडा विभागीय सचिव अशोकजी पटवर्धन साहेब उपस्थित होते.



# शिवसेनेचा संवेदनशील उपक्रम! रक्तदान व सामाजिक उपक्रमांनी साजरा झाला उत्सवमय दिवस

**गेवराई : प्रतिनिधी**

शिवसेना तालुकाप्रमुख उद्धव बापू मडके यांच्या वाढदिवसानिमित्त विविध समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून समाजसेवेचा संदेश देत उत्साहात वाढदिवस साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात गणेश पवार यांनी आयोजित केलेल्या प्रभू श्रीरामचंद्रांच्या महाआरतीने भक्तिमय वातावरणात करण्यात आली. त्यानंतर अवलिया दर्गा येथे चादर चढवून हिंदू–मुस्लिम ऐक्याचा सुंदर संदेश देण्यात आला. त्याचबरोबर रक्तदान शिबिर, तसेच सरकारी दवाखान्यात फळवाटपाचा उपक्रम राबवून उद्धव बापूंच्या वाढदिवसाला सामाजिकता आणि मानवतेची जोड देण्यात आली.

या सर्व कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाप्रमुख चंद्रकांत (आप्पा) नवले, मराठवाडा निरीक्षक अविनाश भाऊ जाधव, युवा सेना जिल्हाप्रमुख अजय भैय्या सुरवसे, युवा सेना तालुकाप्रमुख बबनजी मोघे, शिवसेना विधानसभा प्रमुख नवनाथ गवते, युवा सेना विधानसभा अध्यक्ष व शहर प्रमुख मुकेश महाजन, मा. उपजिल्हाप्रमुख प्रकाश नरनाळे, उमेश शिंदे, शिवसेना तालुकाध्यक्ष बाळासाहेब खेडकर, महाराष्ट्र राज्य नोटरी असोसिएशनचे उपाध्यक्ष ॲड. राहुल राका, ॲड. मुकुंदराज खेत्रे, दादा अनमुले, शिवसेना नेते नागेश मिठे पाटील, दत्तू नाना येवले, अभय भांडवलकर, विक्रम राजे भोसले, तेजस साबळे, प्रमोद आहेर, स्वप्निल आबूज, अर्जुन तपसे, गणेश ठाकूर, शिवराज उगले, कृष्णा गवते, शाखाप्रमुख मोरे, गणेश वारे, अंकुश गिरी यांसह अनेक शिवसैनिक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे उत्कृष्ट आयोजन गणेश पवार व दत्तू नाना येवले यांनी केले. समाजसेवेचा आणि ऐक्याचा संदेश देत साजरा झालेला हा वाढदिवस, शिवसेना कार्यकर्त्यांमध्ये आणि नागरिकांमध्ये प्रेरणादायी ठरला. "सेवा, समाज आणि श्रद्धा, हाच उद्धव बापू मडके यांच्या कार्याचा आधार," असा सूर सर्व उपस्थितांच्या मुखातून उमटला.

# उद्धव ठाकरेंनी नांदर येथील अतिवृष्टीने बाधीत झालेल्या शेतकऱ्यांशी साधला संवाद

**पैठण : सर्जेराव खडसन**

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आज पासुन चार दिवस मराठवाडा दौऱ्यावर असून त्यांनी पैठण तालुक्यातील नांदर गावात अतिवृष्टीने बाधीत झालेल्या नुकसानीची पाहणी करून त्यांना मिळालेल्या सरकारी मदतीचा आढावा घेत शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला. यावेळी त्यांच्या सोबत शिवसेना उपनेते संपर्कप्रमुख विनोद घोसाळकर, अंबादास दानवे, चंद्रकांत खैरे, शिवसेना सचिव मिलिंद नार्वेकर यांच्यासह स्थानिक पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे हे आजपासून चार दिवस मराठवाड्याच्या दौऱ्यावर आलेले आहेत. आज त्यांनी तालुक्यातील नांदर येथे अतिवृष्टीने बाधीत झालेल्या शेतकऱ्यांच्या थेट बांधावर जाऊन राज्याने जाहीर केलेली अतिवृष्टी नुकसानीची भरपाई प्रत्यक्षात मिळाली की नाही याची माहिती घेऊन येथील शेतकऱ्यांशी संवाद साधतांना म्हणाले



की, मी राजकीय प्रचार करायला आलो नाही. दरवेळी निवडणुका आल्यावर आम्ही राजकीय नेते येतो अन् तुमच्या कोपराला गुळ लावून जातो. तुम्ही फारच भोळे आहात स्वप्न दाखवलं की त्याला बळी पडता असे म्हणत गेल्या वर्षभरात आपत्तीवर आपत्ती येत आहे. त्यामुळे आत्ताच्या आत्ता संपूर्ण कर्जमुक्ती करून तातडीने हेक्टरी ५० हजार रुपये मिळेपर्यंत मी तुमच्यासोबत राहणार आहोत असे सांगितले. या संवाद दौऱ्यावेळी मा.आ. अंबादास दानवे, मा.खा. चंद्रकांत खैरे, शिवसेना उपनेते संपर्कप्रमुख विनोद घोसाळकर, शिवसेना सचिव आमदार मिलिंद नार्वेकर यांच्यासह स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.


# महाराष्ट्र प्रदेश विद्यार्थी काँग्रेस प्रदेश सचिवपदी ॲड. परमेश्वर अंडील यांची निवड

**बीड : प्रतिनिधी**

बीडचे भूमिपुत्र परमेश्वर अंडील यांची महाराष्ट्र प्रदेश विद्यार्थी काँग्रेसच्या NSUI राज्य सचिव पदी निवड करण्यात आली. अंडील यांनी सिद्धार्थ विधी महाविद्यालय, मुंबई येथून LLB पदवी प्राप्त केली व राजकारणात आपले महत्वाचे स्थान निर्माण केले. त्याच्या निवडीमुळे सर्वच क्षेत्रातून अभिनंदन होत आहे. परमेश्वर अंडील हे गेल्या अनेक वर्षापासून काँग्रेस पक्षांमध्ये प्रामाणिक

## बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील सर्वसामान्य तरुणाचा काँग्रेस पक्षाने न्याय दिला!

कार्यकर्ता म्हणून काम पाहत आहेत. त्यांच्या कामावर खुश होत पक्षाने त्यांना महाराष्ट्र प्रदेश विद्यार्थी काँग्रेसच्या NSUI सचिव म्हणून नियुक्त केले. येणाऱ्या काळात



विध्यार्थ्यांच्या प्रश्नावर सरकारशी झगडत राहू असे त्यांनी पत्रकात म्हटले आहे. या निवडी बद्दल ॲड. परमेश्वर अंडील याचे महाराष्ट्रातून भरभरून कौतुक होत आहे.

# साक्री : सबस्टेशनच्या कामाच्या तातडीसाठी आंदोलकांचा इशारा

## अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती व संभाजी ब्रिगेडतर्फे निवेदन सादर

**धुळे : उमाकांत अहिरराव**

साक्री तालुक्यातील मौजे छडवेल.प, अष्टाने व कावठे या गावांमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून गंभीर वीज समस्येला ग्रामस्थांना सामोरे जावे लागत आहे. 15 ते 20 वर्षांपासून सततच्या प्रयत्नांनंतरही 24 तास वीजपुरवठा सुरू करण्यात महावितरणकडून कोणतीही ठोस पावले उचलली गेलेली नाहीत, अशी ग्रामस्थांची व्यथा असून, या पार्श्वभूमीवर अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती व संभाजी ब्रिगेड साक्री यांच्या वतीने उपअभियंता व तहसीलदार साक्री यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, या भागातील नागरिकांना सणासुदीच्या काळातदेखील वीजपुरवठा मिळत नाही. सकाळ–संध्याकाळ वीज गायब असते, ज्यामुळे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. आजारी रुग्ण, नवजात बालकं, विद्यार्थी व शेतकरी या सगळ्यांचे हाल होत आहेत. लोडशेडिंगमुळे शेतकऱ्यांना रात्रीच्या वेळी शेतात पाणी भरण्यासाठी जावे लागते, ज्यामुळे वन्यजीवांचा धोका निर्माण होतो. ग्रामस्थांनी महावितरण कंपनीसाठी सबस्टेशनसाठी आवश्यक जागा उपलब्ध करून दिली असतानाही अनेक वर्षे कार्यवाही झालेली नाही.



अनेक नेते आले आणि गेले, मोर्चे झाले, आंदोलनं झाली; परंतु सबस्टेशनच्या कामाची तातडीची अंमलबजावणी कुठेच दिसत नाही. यामुळे अनेक ग्रामस्थ गाव सोडून साक्री शहरात स्थलांतर करत आहेत, अशी माहिती निवेदनात देण्यात आली. ग्रामस्थ व संघटनांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, 15 ते 20 दिवसांच्या आत सबस्टेशन संदर्भात ठोस निर्णय झाला नाही, तर आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारण्यात येईल. या निवेदनावेळी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष स्वातंत्र्य सेनानी मा. प्रदीप (बाबा) खंडापूरकर यांच्या आदेशानुसार आणि निवड समिती प्रदेशाध्यक्ष तसेच संभाजी ब्रिगेड तालुकाध्यक्ष अनिल दादा देसले यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन सादर करण्यात आले. यावेळी धुळे जिल्हा ग्रामीण अध्यक्ष सचिन दादा पाटील, कृषी विभाग जिल्हाध्यक्ष गिरीश दादा नेरकर, जिल्हा कार्याध्यक्ष दीपक नांद्रे, अध्यात्मिक आघाडी जिल्हाध्यक्ष जितेंद्र बच्छाव, सैनिकी विभाग जिल्हाध्यक्ष राकेश देसले, सहसंघटक दीपक भामरे, व्यापारी असोसिएशन अध्यक्ष पंकज काकुस्ते, तालुका संघटक प्रमोद बोरसे, तालुका उपाध्यक्ष राहुल भामरे, सहसचिव हर्षल देसले, कार्याध्यक्ष महेंद्र देसले, शहराध्यक्ष बंटी सोनवणे, शहर कार्याध्यक्ष महावीर जैन, शहर संघटक किशोर चौधरी, शहर सहसचिव गणेश जाधव, तसेच प्रगतशील शेतकरी अशोक भामरे आदी मान्यवर उपस्थित होते. सभागृहात एकमुखाने ठराव पारित करत "छडवेल.प, अष्टाने व कावठे सबस्टेशनचे काम तातडीने सुरू करावे, अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला.

# चेक बाउन्स प्रकरणी आरोपीस 2 लाख पन्नास हजार दंड

**बीड : प्रतिनिधी**

बीड येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयाने दिनांक 31-10-2025 रोजी चेक बाउन्स प्रकरणांत आरोपी रुपेश राजेंद्र शेळके राहणार बीड यांस दोन लाख पन्नास हजार रुपये दंड आणि सदरचा दंड न भरल्यास 3 महिने कारावासाची शिक्षेबाबत आदेश केला आहे.

बीड येथील जालना रोडवरील श्री. माऊली मेडीकल ॲंड जनरल स्टोअर्स यांच्यासाठी वैद्यकीय सामान उपलब्ध करून देणेकरीता आरोपी रुपेश राजेंद्र शेळके यांनी रक्कम 1,98,000/- रुपये (अक्षरी एक लाख आठ्याण्णव हजार रुपये) दि.27 जुलै 2020 रोजी घेतले होते. परंतु अनेक महिने मेडीकल सामान उपलब्ध करवून देता न आल्याने घेतलेले पैसे परतफेड करण्याकरीता रुपेश शेळके यांच्यामार्फत सेंट्रल बँक ऑफ इंडिया या बँकेचा चेक मेडीकलमध्ये देण्यात आला होता. यानंतर सदर चेक बँकेत वठविण्यास टाकला असता चेक बाउन्स झाला आणि फिर्यादीस पैसे मिळाले नाही. तसेच या कारणाने वकीलामार्फत कायदेशीर देखील नोटीस पाठविण्यात आलेली होती परंतु त्यास रुपेश शेळके यांनी प्रतिसाद दिला नाही. यामुळे श्री. माऊली



मेडीकल ॲंड जनरल स्टोअर्सचे प्रोप्रायटर रामदास भानुदास राऊत यांच्यामार्फत रुपेश राजेंद्र शेळके यांच्याविरुद्ध बीड येथील मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयात फौजदारी केस दाखल केली होती. सदर कोर्ट प्रकरणात फिर्यादीतर्फे सादर करण्यात आलेला सर्व साक्षीपुरावा व कागदपत्रे यामुळे सबळ पुराव्यानिशी चेक बाउन्स बाबत निगोशिएबल इंस्ट्रुमेंट ॲक्टचे कलम 138 अन्वये आरोपीने गुन्हा केल्याचा सिद्ध झाल्याने बीड येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयाने दिनांक 31-10-2025 रोजी अंतिम निकालात आरोपी रुपेश राजेंद्र शेळके यांस दोन लाख पन्नास हजार रुपये दंड आणि सदरचा दंड न भरल्यास 3 महिने कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

या चेक बाउन्स संबधीत फौजदारी केसमध्ये फिर्यादीतर्फे मुख्य वकील म्हणून ॲड. कपिलकुमार विष्णुपंत बेदरे यांनी न्यायालयात अत्यंत प्रभावीपणाने काम पाहिले व त्यांच्या मार्फत कोर्टात सादर करण्यात आलेला साक्षीपुरावा आणि अंतिम युक्तिवाद या केसमध्ये अत्यंत महत्वाचा ठरला. या केस दरम्यान ॲड. कपिलकुमार विष्णुपंत बेदरे यांना ॲड. अरविंद बन्सी काळकुटे, ॲड. सिद्धार्थ मधुकरराव वारे, ॲड. राजेश बागलाने यांनी सहकार्य केले.